# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-६३ दिनांकः- १७/०३/२०२१

## घरफोडया करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हेशाखा युनिट-३ विरार यांनी ताब्यात घेवून लाखो रूपये किंमतीचे सोन्या, चांदीचे दागिने व रोख रक्कम केली हस्तगत.

दिनांक ०७/०३/२०२१ रोजी सकाळी ०९.०० वाजता ते दिनांक १४/०३/२०२१ रोजी संध्याकाळी १७.०० वाजता दरम्यान फिर्यादी श्री रमेश धोंडु हुंबरकर वय-४० वर्षे, रा. नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर हे त्यांच्या मुळ गावी गेले असताना त्यांच्या बंद फ्लॅटचे किचनचे खिडकीचे बाहेरील लोखंडी ग्रील कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडुन घरात प्रवेश करून त्यांचे घरातील २५ तोळे सोने, १ किलो चांदी व १७,००,०००/- रुपये रोख रक्कम अशी एकुण २४,९३,०००/- रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी करुन चोरुन नेले बाबत तुळींज पो.ठाणे येथे दिलेल्या तक्रारी वरुन गु.र.नं. I ३८०/२०२१ भां.द.वि.स.कलम- ४५४,४५७,३८० प्रमाणे दि.१५/०३/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) , मा. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस पथक यांनी नमुद गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने तांत्रीक विश्लेषण, सि.सि.टि.व्ही. फुटेज, गुप्त बातमीदार, गुन्हे करण्याची पध्दत, याबाबत सखोल तपास करुन तसेच पोना/ मनोज सकपाळ यांना बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहीतीवरुन आरोपीत नामे- अब्दुल इद्रीस शेख वय- ४३ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व. यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन एकुण २९ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, २ किलो वजनाचे चांदीचे दागिने व नाणी, तसेच रोख रक्कम ९,७६,२५०/- रुपये व गुन्हयात वापरलेली ॲक्टीवा मोटरसायकल असा एकुण १८,५३,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, श्री. एस. जयकुमार, अपर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ उमेश भागवत, सफौ/ अनिल वेळे, पो.हवा/ अशोक पाटील, पो.ना/ मनोज चव्हाण, पो.ना/ प्रदीप टक्के, पो.ना/ मुकेश तटकरे, पो.ना./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.शि/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांनी पार पाडली आहे.

Scanned with CamScanner